**<u>रे.मु.नं.२३७/२०१४</u>**
मधुकर वि. लाला
**<u>नि.क्रं.५७ लगत</u>**

प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र. १
मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की,

| | | |
|---|---|---|
| नाव | – | दादा धोंडिबा धुमाळ, |
| वय | – | ८० वर्षे, |
| व्यवसाय | – | शेती, |
| राहणार | – | बेनवडी, ता. कर्जत, जि. अहमदनगर. |

**<u>प्रतिवादींचे विधिज्ञ श्री. एन. बी. कदम यांच्यातर्फे सदर साक्षीदाराचा अतिरीक्त सरतपास शपथेवर सुरु</u>**

६. याच दावा मिळकतीबद्यल रे.मु.नं. ९८/१९८६ दाखल झाला होता. तो दावा मंजुर झाला होता. त्याच्या नाराजीने मी अपिल केले. सदरचे अपिल मा. जिल्हा न्यायालयाने मंजुर केले. सदर निकालाच्या नाराजीने वादी यांनी मा. उच्च न्यायालयात अपिल दाखल केले. या वादीने ते अपिल काढून घेतले. सदर अपिल काढून घेतल्याबद्यलची सत्यप्रत मी अभिलेखावर दाखल केली आहे. त्यास **<u>नि.क्र.६०</u>** देण्यात येते. नाशिक येथील भमी अभिलेख यांचेकडे मी अर्ज केला होता. त्याची प्रत मी अभिलेखावर दाखल केली आहे. वादीसोबत माझा आर.टी.सी. १६६/२००७ खटला दाखल झाला होता. त्याच्या निकालाची सत्यप्रत अभिलेखावर दाखल आहे. त्यास **<u>नि.क्र.६१</u>** देण्यात येत आहे. आर.टी.सी. क्र. ५४/२०१० ची झेरॉक्स प्रत अभिलेखावर दाखल केली आहे. ग्रामसेवक, बेनवडी यांना मी अर्ज दिला होता त्याची प्रत मी अभिलेखावर दाखल केली आहे. सदर अर्जावर पोहच म्हणुन ग्रामसेवकाची सही आहे. घराची नोंद झाल्याबद्यल ७/१२ उताऱ्याच्या प्रती मी अभिलेखावर दाखल केल्या आहेत. मी तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख कर्जत यांच्याकडे अर्ज दिला होता. मोजणीची फी २५००/– रुपये मी भरली होती. मी अभिलेखावर सदर रक्कम भरल्याबाबत अर्जाची झेरॉक्स प्रत अभिलेखावर दाखल केली आहे. मी अभिलेखावर नकाशाची झेरॉक्सप्रत दाखल केली आहे. मी जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख, अहमदनगर यांचेकडे दि. २९/०९/२०१५ रोजी जो अर्ज दिला होता त्याची झेरॉक्स प्रत अभिलेखावर दाखल केली आहे. वादीने दिलेल्या नोटीसला मी उत्तर दिले होते. त्याची कार्यालयीन प्रत मी अभिलेखावर दाखल केली आहे त्यावर माझ्या विधिज्ञांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. सदर नोटीसचे उत्तर पाठविलेची पोस्टाची पावती व तसेच नोटीसचे उत्तर त्यांना मिळाल्याची पावती अभिलेखावर दाखल केली आहे. सदर नोटीस पोहच पावती वर वादीची सही आहे व त्यावर पोस्टाचा शिक्का आहे. त्या पावत्या अनुक्रमे **<u>नि.क्र.६२ ते ६४</u>** वर आहेत. विधिज्ञ श्री.

बाळासाहेब बागल यांनी मला नोटीस पाठवली होती. ती नोटीस मला मिळाली. नोटीसची मुळ प्रत मी अभिलेखावर दाखल केली आहे. त्या नोटीसला सन २००७ मध्ये मी उत्तर दिले. मी उत्तर पोस्टामार्फत पाठवले. त्याच्या पावत्या मी अभिलेखावर दाखल केल्या आहेत. त्या एकुण ३ पावत्या असुन त्यास एकत्रीतरित्या **नि.क्र.६५** देण्यात येत आहे. नोटीसला उत्तर माझ्या विधिज्ञांनी दिलेले आहे. ती झेरॉक्स कॉपी अभिलेखावर दाखल केली आहे.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास वादीतर्फे विधिज्ञ श्री. एस. जे. वाकडे यांच्यामार्फत सुरुः**

७. माझे इयत्ता २ री पर्यंत शिक्षण झाले आहे. प्रतिवादी क्र. ५ व ६ ही माझे मुले आहेत. माझी दोन्ही मुले शेती करतात. महेंद्र जालिंदर धुमाळ माझा नातु आहे. नाथा कुंडलिक धुमाळ माझा मोठा भाऊ आहे. गट क्र. २३९ चे क्षेत्र किती आहे ते आता मला सांगता येणार नाही. गट क्र. २३५ चे देखील क्षेत्र किती आहे ते मला सांगता येणार नाही. गट क्र. २३९ ही आमच्या वडीलांची खरेदीची मिळकत आहे. ती खरेदी सन १९४४ ला घेतली आहे. त्या मिळकतीचा जुना सर्व्हे क्र. ५० होता. सदर सर्व्हे क्र. ५० चे क्षेत्रफळ मला सांगता येणार नाही. गट क्र. २३९ मध्ये वाटण्या झाल्या आहेत. गट क्र. २३९ हा पुर्व–पश्चिम आहे. सदर वाटणीमध्ये पुर्वेकडील वाटणी ही मला आली. पश्चिमेकडील वाटणी ही नाथा कुंडलिक धुमाळ याला आली. गट क्र. २३९ मध्ये मला किती क्षेत्र वाटून आले हे मला आठवत नाही. हे खरे नाही की, मला आलेल्या वाटणीमध्ये मी, माझा मुलगा जालिंदर व नातु महेंद्र असे एकत्रात उपभोगतो. हे मला सांगता येत नाही की, जालिंदर व सुभाष यांच्यामध्ये वाटप हे सन २०१९ या वर्षी झाले. जालिंदर व सुभाष या दोघांना पुर्व–पश्चिम वाटणी देण्यात आली. माझा नातु महेंद्र हा बारामती येथे शाळा शिकतो. तो इयत्ता ११ वीच्या वर्गात शिकत आहे. हे खरे आहे की, रे.मु.नं. ३२/२०१९ मध्ये तडजोड होऊन काही क्षेत्र महेंद्र याच्या नावे केले आहे. हे खरे आहे की, महेंद्र प्रत्यक्षात त्याचे क्षेत्र वहिवाटत नसुन त्याचे वडील जालिंदर हे क्षेत्र वहिवाटतात. हे खरे आहे की, गट क्र. २३९ च्या पुर्वेला गट क्र. २३५ आहे.

**प्रश्नः** गट क्र. २३५/१ ते ३ चे फील्ड झाले नाही म्हणजे काय झाले आहे ते सांगा ?

**उत्तरः** फील्ड झाले नाही म्हणजे तो गट क्रमांक एकत्रीत आहे असे मला म्हणायचे आहे.

८. गट क्र. २३५ व २३९ हे दोन्ही गटाचा मुळ सर्व्हे क्र. ५० होता. हे खरे आहे की, सर्व्हे क्र. ५०/१ पैकी निम्मी ५ हे. १३ आर. वादीचे आजोबा गोंडिबा यांनी विकत घेतली. मधुकर, किसन, भिमराव व सोमनाथ हे चौघे भाऊ आहेत. हे खरे आहे की, मधुकर व किसन हे मुंबई येथे एस.टी. ड्रायव्हर आहेत. गट क्र. २३५ या गटावर कोणाकोणाची नावे आहेत हे मला सांगता येणार नाही. हे मला सांगता येत नाही की, त्या भावामध्ये वाटप होऊन गट क्र. २३५/१, २३५/२ हे मधुकर यांना व २३५/३ हे किसनला मिळाले. किसन हा मुंबई येथे राहतो. तो मुंबईला राहत असल्यामुळे तिन्ही

वाटण्यांची वहिवाट मधुकर करतो किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. धोंडिबा गोपाळा धुमाळ हे माझे वडील आहेत व त्यांचा भानुदास आहे. वादीचे आजोबा गोंडिबा व माझे वडील धोंडिबा यांनी तहसिलला मिळून अर्ज दिला होता किंवा कसे हे मला माहिती नाही. हे खरे आहे की, गट क्र. २३५ व २३९ मध्ये उत्तर–दक्षिण बांध आहे. हे खरे नाही की, मी व माझे वडील गट क्र. २३५ मधील मिळकतीमध्ये अतिक्रमण करण्याचा प्रयत्न करीत होता. हे खरे आहे की, वादीच्या वडीलांनी आमच्याविरुध्द मनाई हुकूम व घोषणेचा मुकदमा क्र. २९/१९८६ दाखल केला होता. हे खरे आहे की, त्याचा निकाल वादीच्या वडीलांच्या बाजुने झाला होता. हे खरे आहे की, त्या निकालाच्याविरुध्द आम्ही अहमदनगर जिल्हा न्यायालय येथे अपिल क्र. २९/१९९६ दाखल केला होता.

**न्यायालयाची कामकाजाची वेळ संपल्यामुळे उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात येतो.**

स.सा.वा.दा.ब.अ.क.केले.

माझे समक्ष,

RAMRAO BABURAO RAUT

Digitally signed by RAMRAO BABURAO RAUT
Date: 2025.09.20 11:11:25 +0530

दि.२०/०९/२०२५.

(आर. बी. राऊत)

२ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर , कर्जत.